ePaper
लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही : फडणवीस

वर्ष - 8 । अंक -110 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- साजिद खानचा मजेशीर व्हिडीओ
- ...म्हणून स्वतःच्याच जाळ्यात अडकलो’
- हिंदूंची एकजूट सर्वांच्या हितासाठीच
- जयशंकर यांनी सांगितली गंभीर स्थिती

www.mahaenews.com | सोमवार, दि. 28 ऑक्टोंबर 2024 | पुणे-पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### महाविकास आघाडीचे जागावाटप : शिवसैनिकांत प्रचंड नाराजी

# जयंत पाटलांनी शब्द फिरवला..!

## भोसरीत आज रवि लांडगे समर्थकांची बैठक : शहरातील तीनही मतदार संघात ठाकरे गटाला संधी नाही

**। पिंपरी।महाईन्यूज।प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाकडे एकही तगडा नेता नसताना निष्ठावंत शिवसैनिकांनी प्रामाणिकपणे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे काम केले. त्यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शहरात येवून आम्हाला शब्द दिला. विधानसभा निवडणुकीत तुमच्या कष्टाला न्याय दिला जाईल. पण, “जयंत पाटलांनी शब्द फिरवला... आता कळेल भोसरीत शिवसेना काय आहे..! ” असा गर्भीत इशारा निष्ठावंत शिवसैनिकांनी दिला आहे.**




विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या जागा वाटपामध्ये “निवडून येण्याची क्षमता” या निकषावर भोसरी मतदार संघातून रवि लांडगे यांना संधी मिळले, अशी अपेक्षा शिवसैनिकांना होती. किंबहुना, लांडगे विरुद्ध लांडगे अशी लढत झाल्यास शिवसेनाचा आमदार निवडून येईल, असा दावा केला जात होता. गेल्या आठ दिवसांपासून मुंबई आणि पुण्यात राजकीय खलबतं सुरू होती.

दरम्यान, शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशा तीनही मतदार संघामध्ये महाविकास आघाडीतून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने उमेदवार दिले आहेत. पिंपरीतून सुलक्षणा शिलवंत, चिंचवडमधून राहुल कलाटे आणि भोसरीतून अजित गव्हाणे यांच्या नावाची घोषणा झाली आहे. त्यामुळे रवि लांडगे समर्थकांसह निष्ठावंत शिवसैनिकांत नाराजी उफाळून आली आहे.

भोसरीतील शिवसेना विभागप्रमुख संतोष वाळके यांनी म्हटले आहे की, शिरुर लोकसभा निवडणुकीच्या वेळी भोसरी विधज्ञनसभा मतदार संघात फक्त शिवसेनेने डॉ. अमोल कोल्हे यांचे काम निष्ठेने आणि प्रामाणिकपणे केले आहे, असे विधान जयंत पाटील साहेबांनी केले होते. मग, आता विधानसभा तिकीट वाटपावेळी जयंत पाटलांना शिवसेना का आठवली नाही? भोसरीत येवून जयंत पाटलांनी शब्द फिरवला. आता कळेल भोसरी विधानसभेची शिवसेना काय आहे.

### काँग्रेसने फक्त सतरंज्या उचलायच्या आहेत का?

महाविकास आघाडीच्या जागावाटपामध्ये महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या पक्षश्रेष्ठींनी मावळ- उबाठा, चिंचवड, पिंपरी आणि भोसरी शरद पवार गटाला दिले आहे. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी काय फक्त सतरंज्या उचलायच्या आहेत का? असा सवाल ॲड. उमेश खांडरे यांनी उपस्थित केला आहे. ते काँग्रेसच्या नॅशलन स्टुडंट युनियन ऑफ इंडियाचे महाराष्ट्रातील व्हाईस प्रेसिडेन्ट आहेत. “काँग्रेस – कायम दुसऱ्या उमेदवारांच्या सतरंज्या उचलायला. यात माझ्या स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांचे व त्यांचे नेतृत्व करणाऱ्या सर्व नेत्यांचे त्याचबरोबर कायम सावत्र भावासारखी वागणूक देणाऱ्या महाराष्ट्र काँग्रेस च्या नेत्यांचे अपयश आहे.” अशी खंतही त्यांनी व्यक्त केली आहे.

### मोरेश्वर भोंडवे यांच्या हातावर तुरी?


उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे समर्थक माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांनी निवडणुकीच्या तोंडावर शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला होता. त्यामुळे त्यांना उमेदवारी मिळेल, असा दावा केला जात होता. यासाठी गेल्या आठ दिवसांपासून भोंडवे मुंबईत पक्षश्रेष्ठींच्या संपर्कात होते. ‘मशाल’ चिन्हावर त्यांना संधी मिळेल, असे बोलले जात होते. मात्र, या ठिकाणी ‘तुतारी’ चालली. राहुल कलाटे यांना उमेदवारी मिळाली. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी भोंडवेंच्या हाती तुरी दिल्या आहेत, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

## शिवसैनिकांमध्ये प्रचंड अस्वस्थता...

**भोसरीतून शिवसेना ठाकरे गटातून जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, माजी नगरसेवक रवि लांडगे इच्छुक होते. उबाळे यांनी दोनदा विधानसभा लढवली आहे. तर रवि २०१७ मध्ये महानगरपालिकेत बिनविरोध निवडून गेले होते. त्यामुळे यावेळी दोघांपैकी एकाला शिवसेना ‘मशाल’ चिन्हावर तिकीट मिळेल, अशी निष्ठावंत शिवसैनिकांना अपेक्षा होती. मात्र, पक्षश्रेष्ठींनी हा मतदार संघ ‘तुतारी’ ला दिला. शिवसेना आणि ठाकरे कुटुंबाला मानणारे मतदार संघात किमान ६० हजार मतदान आहे. पूर्वी मतदार संघ शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. विधानसभा निवडणुकीत डावलल्यामुळे शिवसैनिकांमध्ये प्रचंड रोष आहे. किंबहुना, सुलभा उबाळे यांनी संयम ठेवला आहे. काही दिवसांपूर्वी, पत्रकारांशी बोलताना “लोकसभा निवडणुकीत शिवसैनिकांनी निवडणूक हाती घेतली आणि निष्ठेने काम केले. मात्र, आता खासदार अमोल कोल्हे भेटायलासुद्धा तयार नाहीत. आम्ही फक्त पायरी म्हणून रहायचे काय?” अशी खंत उबाळे यांनी आपली नाराजी बोलून दाखवली होती.**

## रवि लांडगे म्हणतात... हे महादेवा सर्व तुला समर्पित...!

**दरम्यान, भोसरीतील दंबग नेते आणि ठाकरे गटाकडून तीव्र इच्छुक असलेले रवि लांडगे यांनी जागा वाटपात संधी न मिळाल्यामुळे सोशल मीडियावर आपली भावना व्यक्त केली आहे. ते म्हणतात... “हे महादेवा... स्व. अंकुशभाऊंच्या विचारांचा वारसदार बनण्याची संधी दिलीस... हे खुप आहे माझ्यासाठी. अंकुशभाऊंच्या विचारांवर नेहमी ठाम राहुन, निस्वार्थपणे समाजसेवा करत राहील. तुझा प्रत्येक निर्णय मला मान्य आहे. जसा तूला पुर्णपणे समर्पित आहे, तसंच समाजासाठी पुर्ण समर्पित राहण्याचा प्रयत्न करील. सर्वांच्या आयुष्यात अशीच कृपा असुद्या देवा..” विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी, आपल्याला डावलेले जाईल, याचे संकेत रवि लांडगे यांना मिळाले होते. किंबहुना, मुंबईत आपल्याला उमेदवारी मिळू नये. यासाठी मोठे राजकारण केले जात आहेत, याची कुणकूण त्यांना लागली होती. त्यामुळेच त्यांनी “अनिवार्य नियती च गरगर फिरणं.... मनाच्या महान संयमाने सहन करत जगायचे असते...” अशा शब्दांत त्यांनी सोशल मीडियावर आपल्या भावनांना वाट मोकळी करुन दिली होती.**






# प्रशांत जगतापांच्या उमेदवारीला ‘स्पीडब्रेकर’

## विधानसभा निवडणूक: मतदारसंघाबाहेरचा उमेदवार मुद्दा गाजणार ?

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी आणि महायुतीचे उमेदवार जवळजवळ निश्चित झाले आहेत. तरही काही ठिकाणी आघाड्यांमधून उमेदवारांना विरोध होत आहे.**





हडपसर विधानसभा मतदारसंघात शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून माजी महापौर प्रशांत जगताप यांना उमेदवारी मिळाली आहेत. तर अजित पवार गटाकडून विद्यमान आमदार चेतन तुपे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मतदारसंघात जगताप व तुपे अशी फाइट निश्चित असताना आता महाविकास आघाडीकडून प्रशांत जगताप यांच्या उमेदवारीला तीव्र विरोध सुरू केला.

प्रशांत जगताप हे मतदारसंघाच्या बाहेरील उमेदवार असून,त्यांची उमेदवारी रद्द करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडे करण्यात आली आहे. उमेदवारी रद्द न केल्यास हडपसर विकास आघाडीकडून उमेदवारी देऊन निवडणूक लढविली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. हडपसर मतदारसंघातील निवडणुकीसंदर्भात हडपसर विकास आघाडीच्या वतीने महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब शिवरकर, शिवसेना उबाठा गटाचे माजी आमदार महादेव बाबर, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस दोन्ही गट या सर्वांनी या भागाचे खासदार अमोल कोल्हे यांची भेट घेतली. यावेळी चौदा माजी नगरसेवकही उपस्थित होते. विधानसभा निवडणूक जसजशी जवळ येत आहे तसे पुणे जिल्ह्यातील राजकारणात नवनवे ट्विस्ट येत आहेत. पुण्यातील मतदारसंघांतील लढतींचं चित्र आता बऱ्यापैकी स्पष्ट झालं आहे. आताही एक मोठी बातमी समोर आली आहे. मावळ विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीने उमेदवार न देता चक्क अपक्ष उमेदवाराला पाठिंबा दिला आहे. महाविकास आघाडीतील शरद पवार गटाने ही मोठी खेळी केली आहे. दरम्यान, या मतदारसंघात अजित पवार गटाने विद्यमान आमदार सुनील शेळके यांनाच उमेदवारी दिली आहे. त्यांच्या विरोधात उमेदवार न देता अपक्ष उमेदवार बापूसाहेब भेगडे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय शरद पवार गटाने घेतला आहे.

### हडपसर विकास आघाडीचा प्रयोग...

महाविकास आघाडीचा उमेदवार बदलण्याची विनंती यावेळी करण्यात आली आहे. हडपसरच्या बाहेरचा उमेदवार नको हे महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांना याबाबत कळविले होते. तरीही मतदारसंघाच्या बाहेरील उमेदवार दिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. अमोल कोल्हे यांची सामूहिकरित्या भेटून तसेच या उमेदवारीबाबत योग्य ते निर्णय घेण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. यामध्ये बाळासाहेब शिवरकर, काँग्रेसचे दिलीप तुपे, महादेव बाबर, माजी नगरसेवक विजय देशमुख, तानाजी लोणकर, राजूभाऊ बाबर, भरत चौधरी, तानाजी लोणकर, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार पक्षाचे माजी नगरसेवक योगेश ससाणे, माजी उपमहापौर निलेश मगर, माजी उपमहापौर बंडूतात्या गायकवाड, प्रवीण तुपे आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे आनंद अळकुटी, शिवसेनेचे नगरसेविका प्राचीताई आल्हाट, संगिताताई ठोसर, शरद पवार गटाचे शहर उपाध्यक्ष समीर तुपे अशा सर्वांच्या वतीने मुंबईत भेट घेऊन उमेदवारी बदलण्याची मागणी करण्यात आली आहे. ही मान्य न झाल्यास 2002 च्या महापालिका निवडणुकीप्रमाणे हडपसर विकास आघाडीचा प्रयोग केला जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

---

# ‘फिरते मोफत वाचनालय’ ला प्रतिसाद

## चंद्रकांत पाटील यांचा विधायक उपक्रम : वाचक, नागरिकांमधून कौतूक

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विद्येचे माहेरघर म्हणून पुणे शहराची जगभरात ओळख निर्माण झाली आहे. याच पुण्यात खळाळून वाहणाऱ्या ज्ञानगंगामुळे असंख्य आयुष्य पावन झाली आहेत. यातच राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अनेक शैक्षणिक उपक्रमांना नेहमीच पाठबळ दिले आहे.**






चंद्रकांतदादांनी सुरू केलेल्या ‘फिरते वाचनालय’ या उपक्रमाला कोथरूडच्या नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.चंद्रकांत पाटील यांनी कोथरूड मतदारसंघात ‘फिरते मोफत वाचनालय’ हा उपक्रम सुरू केला होता. या फिरत्या वाचनालयात जवळपास पाच हजार पुस्तकांचा समावेश असून आतापर्यंत वाचनालयाचा लाभ घेणाऱ्यांना कसलाही त्रास झालेला नाही. विशेष म्हणजे या उपक्रमाचा आतापर्यंत अगदी लहान मुलांपर्यंत ते आबालवृद्धांनी लाभ घेतला आहे. एका बाजूला वाचन संस्कृती लोप पावत असतांना तसेच व्हाट्सएपच्या, फेसबुक आणि आणि युट्युब तसेच सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकलेली तरूणाई पुस्तके वाचू लागल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. चंद्रकांत पाटील यांनी सुरू केलेल्या उपक्रमाचा आता सगळ्या स्तरातून कौतुक केले जात आहे.

.दरम्यान, पुस्तकांचे स्थान मानवाच्या जीवनात गुरुस्थानी आहे. वाचनाने माणूस समृद्ध होतो. संपन्न होतो. काळाच्या ओघात वाचन संस्कृती लोप पावत चालेल ही संस्कृती माझ्या कोथरूडमध्ये खोलवर उजावी यासाठी ‘फिरते वाचनालय’हा अभिनव उपक्रम राबविला आहे. याचा कोथरूडकर लाभ घेत असल्याची बाब अत्यंत आनंददायक आहे. अशी भावना चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केली आहे.

### ऑनलाइन फ्रॉडपासून सावध रहा...

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांच्या ११५व्या मन की बात कार्यक्रमाचा आज केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी देखील आनंद घेतला. बाल शिक्षण मंदिरमधून सामूहिकरित्या पाहिलेला संवाद ‘मन की बात’च्या मुख्य प्रसारणातही समाविष्ट करण्यात आला. यावेळी नागरिक आणि भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, मा. नगरसेवक आणि कार्यकर्तेही उपस्थित होते. यावेळी सभागृहातील उपस्थितांना पाटील यांनी संबोधित केले. मन कि बात या कार्यक्रमानंतर चंद्रकांत पाटील यांनी मत व्यक्त करताना म्हटले कि, आजच्या ‘मन की बात’मधून माननीय मोदीजींनी सर्व देशवासीयांना ऑनलाइन फ्रॉडपासून सावध राहण्याचे आवाहन केले. मोदीजींचे हे आवाहन अतिशय महत्त्वाचे आहे. सर्वांनी त्यांचे मार्गदर्शन गांभीर्याने घेत आपली फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी , अशी भावना या वेळी पाटील यांनी व्यक्त केली. लोकलसाठी व्होकल या मंत्रानुसार आपली खरेदी करू या. हा असा नव भारत आहे जिथे अशक्य हे फक्त एक आव्हान आहे, जिथे मेक इन इंडिया आता मेक फॉर वर्ल्ड झाली आहे, जिथे प्रत्येक नागरिक एक कल्पक संशोधक (innovator) आहे, जिथे प्रत्येक आव्हान ही एक संधी आहे. आपल्याला भारताला केवळ स्वावलंबी बनवायचे नाही, तर संशोधनाचे (innovation) जागतिक शक्ती केंद्र (पॉवरहाऊस) म्हणून आपला देश मजबूत करायचा आहे, असे आवाहन मोदी यांनी मन कि बात मधून केले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये महायुतीची वज्रमुठ!

## शहरातील तीनही उमेदवार निवडून आणणार : खासदार श्रीरंग बारणे

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. त्यामुळे विकासात्मक मुद्दे घेऊन निवडणुकीला महायुती एकजुटीने सामोरे जात आहे. जनता महायुतीच्या मागे आहे. पिंपरी चिंचवड शहरासाठी मेट्रो, पाणी, रस्ते असे अनेक प्रश्न महायुतीने मिटवले आहेत. आम्ही सर्वजण एकदिलाने निवडणुका लढून जिंकणार असल्याचा निर्धार खासदार श्रीरंग बारणे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.**



महायुती व इतर घटक पक्ष यांच्या वतीने रविवारी चिंचवड विधानसभेचे उमेदवार व भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप, पिंपरी विधानसभेचे उमेदवार, आमदार अण्णा बनसोडे आणि भोसरी विधानसभेचे उमेदवार आमदार महेशदादा लांडगे यांचे प्रतिनिधी कार्तिक लांडगे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष योगेश बहल, आमदार अश्विनीताई जगताप, उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे आदींसह महायुतीतील घटक पक्षाचे पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

चिंचवड विधानसभेचे उमेदवार व भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जास्तीत जास्त उमेदवार राज्यातून आणि शहरातील तीनही उमेदवार निवडून आणण्यासाठी भाजप सह सर्व घटक पक्ष एकत्रित काम करीत आहेत. त्याला त्या सरकारच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली विकासाची गंगा आणि वेग आणखी वाढवण्याचे व्हिजन आहे. पिंपरी चिंचवड शहराचे नाव देशातच नव्हे तर जगात उंचावण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्नशील आहोत, यासाठी जनता आमच्या पाठीशी आहे असा विश्वास शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

सदाशिव खाडे यांनी सांगितले की, चिंचवड विधानसभेचे उमेदवार व भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप आणि पिंपरी विधानसभेचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे सोमवारी तर भोसरी विधानसभेचे आमदार व उमेदवार महेशदादा लांडगे मंगळवारी अर्ज भरणार आहेत अशी माहिती खाडे यांनी यावेळी दिली.

### पिंपरीतील नाराजी दूर करणार : बहल

योगेश बहल यांनी सांगितले की, पिंपरी विधानसभेतून आमदार अण्णा बनसोडे यांची अधिकृत उमेदवारी जाहीर झाली आहे. या ठिकाणी इच्छुक असणाऱ्या इतर व्यक्तींची नाराजी दूर करून अण्णा बनसोडे यांच्यासह महायुतीतील चिंचवड विधानसभेचे उमेदवार शंकर जगताप, भोसरी उमेदवार आमदार महेशदादा लांडगे या तीनही उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून आणण्याचा निर्धार नागरिकांनी केला आहे.

---

# चिंचवडमध्ये राहुल कलाटे, भोसरी अजित गव्हाणे

## महाविकास आघाडीचे जागावाटप : इच्छुकांची चाचपणी अद्याप कायम

। चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नाना काटे आणि चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक अपक्ष लढणारे राहुल कलाटे यांच्यात रस्सीखेच सुरू होती. अखेर महाविकास आघाडीतून शरद पवार गटाकडून राहुल कलाटे यांची आज उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यामुळे चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजपचे शंकर जगताप विरुद्ध शरद पवार गटाचे राहुल कलाटे असा सामना रंगणार आहे..**



तसेच भोसरी विधानसभा मतदारसंघातून शरद पवार गटाचे अजित गव्हाणे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. भोसरीमध्ये भाजपचे आमदार महेश लांडगे विरुद्ध शरद पवार गटाचे अजित गव्हाणे अशी चुरस होणार आहे.

चिंचवड मतदार संघात महाविकास आघाडीतून कोणाला उमेदवारी मिळणार यावरून चर्चा सुरू होती. चिंचवड विधानसभा मतदारसंघात अजित पवार गटाचे नाना काटे आणि राहुल कलाटे यांच्यात चुरस होती. भोसरी विधानसभा मतदारसंघात ठाकरे गटाचे रवी लांडगे, सुलभा उबाळे आणि अजित गव्हाणे यांचं नाव स्पर्धेत होतं. अखेर तिसऱ्या यादीत चिंचवड मधून राहुल कलाटे आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातून अजित गव्हाणे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. भोसरी विधानसभा मतदारसंघात भाजपचे आमदार महेश लांडगे विरुद्ध ठाकरे गटाचे अजित गव्हाणे असा सामना रंगणार आहे.

तर दुसरीकडे बहुचर्चित चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजपचे शंकर जगताप विरुद्ध राहुल कलाटे असा सामना होणार आहे. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत राहुल कलाटे यांचा पराभव झाला होता. त्यामुळे राहुल कलाटे यांना चिंचवड विधानसभा मतदारसंघात शरद पवार गट डावलत होता. परंतु, खासदार अमोल कोल्हे यांच्या मध्यस्थीने कलाटे यांना उमेदवारी मिळाल्याचे बोलले जात आहे.

### नाना काटे यांचे बंड...

चिंचवड विधानसभा मतदारसंघात अजित पवारांचे खंदे समर्थक नाना काटे बंडखोरी करत अपक्ष मैदानात उतरणार आहेत. नाना काटे उद्या (दि.२८) उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून राहुल कलाटे यांना महाविकास आघाडीची उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे महाविकास आघाडी कडून उमेदवारीसाठी प्रयत्न करणाऱ्या नाना काटे यांनी बंडखोरी करत निवडणुकीत उभे राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.पिंपळे सौदागर येथे त्यांच्या कार्यालयात प्रसारमाध्यमांची संवाद साधला. यावेळी माजी नगरसेवक प्रशांत शितोळे, संतोष कोकणे, सागर कोकणे, शाम जगताप यांच्यासह अनेक राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील जवळपास सर्वच नगरसेवक आपल्याबरोबर असल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला आहे.नाना काटे उद्या त्यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.



# संघ; शतकानंतरची वाटचाल!




**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्ताने संघ आणि त्याची कामगिरी यांचे विश्लेषण अनेकपरींनी होईल. गेल्या दशकातील संघाच्या अधिक जोमदार वाढीचा विचार करता, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विरोधक आणि समर्थक अशा दोघांनाही संघाबाबत 'प्रत्यक्षाहून प्रतिमा उत्कट' असा भास होऊ शकतो.**

त्यामुळे, आगामी दशकांमध्ये भारताच्या सार्वजनिक जीवनावर परिणाम करणाऱ्या त्याच्या दोन महत्त्वाच्या कामगिरींची नोंद घेणे अर्थपूर्ण ठरेल.इथे मांडलेल्या मुद्द्यांच्या आधारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपल्या शंभर वर्षांच्या वाटचालीचे कितपत गोडवे गाईल, याबद्दल शंकाच आहे. कारण गेली शंभर वर्षे, आपली उद्दिष्टे आणि कामगिरी याबाबत संघाने कधीच मोकळेपणाने फारसे भाष्य केलेले नाही. अर्थात असे असले तरी, संघाने गेल्या १०० वर्षांत काय मिळवले याची गोळाबेरीज येत्या काळात नक्कीच मांडली जाईल. त्यामुळे संघाच्या अभ्यासकांनी आणि निरीक्षकांनी संघाच्या कामगिरींची नोंद घेणे आणि त्यांच्या परिणामांवर चर्चा करणे आवश्यक आहे. म्हणून इथे संघाच्या दोन कळीच्या म्हणता येतील अशा कामांची चर्चा केली आहे.संघाची पहिली कामगिरी म्हणजे हिंदू धर्माचा अर्थ, हिंदू धर्माची कल्पना आणि हिंदूंच्या प्रथा यांचा अर्थ पालटणे किंवा त्या अर्थांना स्वत:ला हवे तसे वळण देणे. संघाच्या सुरुवातीच्या दिवसांपासून नेहमीच, एकेश्वरवादी धर्मांशी या संघटनेचे जणू 'विरोधभक्ती'चे नाते दिसून आलेले आहे. त्यामुळे हिंदू संवेदनांना आकार देण्यासाठी या धर्मांची नक्कल करण्याचे प्रयत्न नेहमीच आकर्षक ठरले आहेत. अर्थात, विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील 'एकजिनसी समाज' या राष्ट्रवादाच्या युरोपीय



संकल्पनेनेदेखील हिंदुत्व विचारांना प्रभावित केले होते. संघाने या दोन्ही गोष्टींचे एकत्रीकरण करून, स्वत:ला हिंदू म्हणवून घेणाऱ्या समूहांच्या प्रथा परंपरांच्या विविधतेमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला आहे. या काहीशा अस्ताव्यस्त असलेल्या विविधतेत एकसंधता आणण्यासाठी संघाने दोन मार्ग वापरले आहेत. एक म्हणजे हिंदू अस्मितेवर आधारित राष्ट्रवाद. प्रत्यक्षात, ही ओळख अनेकदा कुणालातरी 'इतर' समूह समजण्यावर आणि या दुसऱ्याबद्दलच्या गहन संशयावर आधारित असते.'इतर' हे बहुतेकदा ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांचे अनुयायी असतात. यातून, 'आपण' ('वुइ') या संकल्पनेला इतरांना सामावून घेण्याऐवजी त्यांना बाजूला करण्यातून सामर्थ्य मिळते.सोबतच, धर्माधारित राष्ट्रवादाबरोबरच संघप्रणीत 'हिंदुत्वा'ने हिंदू असण्याचीही पुनर्व्याख्या करून, नव्याने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. विशिष्ट प्रतीके 'अखिल हिंदू' म्हणून लोकप्रिय केली गेली आहेत. रामजन्मभूमी आंदोलनापासून, हिंदू असणे म्हणजे राम हा देव माहीत असणे, त्याला मानणे असेही ठसवण्याचा प्रयत्न केला गेला. वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये आणि समाजातील वेगवेगळ्या थरांमध्ये राम या संकल्पनेचे वेगवेगळे अर्थ असू शकतात. पण या देवतेची विशिष्ट प्रतिमा सामान्य धार्मिकतेचे प्रतीक म्हणून लोकप्रिय झाली. अशा प्रकारे, हा प्रतीकवाद मान्य असण्या/नसण्यातून हिंदू कोण ते ओळखले वा ठरवले जाऊ लागले.

सध्या या 'हिंदुत्व' प्रकल्पाची गुंतागुंत आणखी वाढली आहे. याचा अर्थ आणखीही स्थानिक देवता आणि परंपरांचे आता 'राष्ट्रीयीकरण' केले जाऊ शकते. वेगवेगळ्या प्रथा आणि देवतांचे स्थानिक महत्त्व आणि स्वायत्तता मान्य करण्याऐवजी, त्यांचे सुलभीकरण, एकसाचीकरण करणारे कथानक रुजवण्याचा प्रयत्न सुरू आहे. यातून प्रथापरंपरांचे अभूतपूर्व एकजिनसीकरण केले जात आहे. ते त्या परंपरांना त्यांच्या स्थानिक अर्थांपासून आणि संदर्भांपासून विलग करते, त्यांचे हिंदू धर्माच्या प्रादेशिक 'उपशाखां'मध्ये रूपांतर करते आणि हिंदूंच्या नवीन, अखिल भारतीय कल्पनेची उभारणी आणखी सोपी करते. या सगळ्याला यश मिळाल्यास हिंदू म्हणजे कोणतीही स्थानिक वैशिष्ट्ये नसलेला, कोणतेही वैविध्य नसलेला एकजिनसी असा एक समाज, ही कल्पना घट्ट रुजू शकते. हा समज एकदा का सार्वत्रिक झाला की, तो मान्य नसणाऱ्यांना वेगळे काढणे सोपे ठरेल.

## प्रासंगिक »

### बुणग्यांचा बाजार!

***....या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यातील अनेकांस स्वत: जिंकण्यापेक्षा समोरच्याच्या पराभवात अधिक रस आहे...***

सध्या सुरू असलेल्या विधानसभेच्या रणधुमाळीचा एक फायदा दिसतो. तो म्हणजे या राज्यातील राजकीय घाण ढवळली जाऊन पृष्ठभागावर आली. ती पाहिल्यावर महाराष्ट्रात उगवणारा प्रत्येक दिवस कालची परिस्थिती बरी होती, अशी भावना का निर्माण करतो, ते कळेल. राजकारणाने आज तळ गाठला आहे असे वाटावे तर उद्या त्यापेक्षाही खोलवर कोणी गेलेला असतो. सध्याच्या बाजारपेठीय नव्हे; तर तद्दन बाजारू संस्कृतीत राजकीय विचारधारा, तत्त्वप्रणाली इत्यादींची अपेक्षा करण्याचा मूर्खपणा कोणीही करणार नाही, हे मान्य. तरीदेखील निदान काहीएक विचार, सभ्यता, सुसंस्कृतपणा दिसावा अशी आशा बाळगण्यात काही गैर आहे, असे नाही. पण इतकी साधी इच्छाही आपले सध्याचे राजकारण पूर्ण करू शकत नाही. ही परिस्थिती भयाण आणि भीतीदायक. कोण कोणाशी राजकीय शय्यासोबत करतो.

मानव विकास निर्देशांक नावाचं विकास मोजण्याचं माप असतं. आर्थिक विकासाला सामाजिक विकासाची म्हणजे नागरिकांचं आयुर्मान, शिक्षण, लिंगभाव समानता यांचीही जोड हवी, दरडोई उत्पन्नातही वाढ हवी. भारतीय अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांच्या या विचाराचं मानव विकास निर्देशांक या मोजपट्टीत रूपांतर केलं

## विकासवंचित जिल्ह्यांच्या समस्यांची दखल घेतली का?

पाकिस्तानचे अर्थतज्ज्ञ महबूब उल हक यांनी. यामुळे मागास प्रदेशांच्या समस्या जगासमोर येऊ लागल्या. त्यांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न सुरू झाले. संयुक्त राष्ट्रसंघाने १९९० पासून दर वर्षी देशांचे माविनि मोजायला, मानव विकास अहवाल प्रसिद्ध करायला सुरुवात केली. भारताने २००१ आणि २०११ साली मानव विकास अहवाल प्रसिद्ध केले होते.महाराष्ट्राचा माविनि ०.७५ आणि राज्यात मुंबईचा माविनी सर्वाधिक, ०.८४१. राज्यात एकूण नऊ जिल्हे अल्प माविनि ०.६०४ ते ०.६७१ श्रेणीत आहेत. या श्रेणीत धुळे जिल्हा सर्वात वर आणि नंदुरबार तळाशी आहे. गडचिरोली आणि वाशीम हे विदर्भातले दोन, नंदुरबार, धुळे हे खानदेशातले दोन आणि उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, नांदेड आणि जालना हे मराठवाड्यातले पाच जिल्हे आणि त्यात ४१ विधानसभा मतदारसंघ आहेत. या नऊ जिल्ह्यांमध्ये एकूण ७,९०१ गावं आहेत. यातल्या फक्त २,३७५ गावांमध्ये आरोग्य सुविधा



(प्राथमिक/सामुदायिक/उपकेंद्र) आहेत. २,४४३ गावांमध्ये महिला आणि मुलांसाठीच्या खास आरोग्यसुविधा आहेत. ३,३४० गावांपर्यंत एसटी पोचते. ४३७५ गावांमध्ये रेशन दुकानं आहेत. याचा अर्थ ३० ते ५० गावं अनेक सुविधांच्या प्रतीक्षेत आहेत.राज्यातल्या या विकासवंचित जिल्ह्यांच्या समस्यांचं अस्तित्व मावळत्या विधानसभेत कितपत दिसतं? पाच वर्षांत या नऊ जिल्ह्यांमधून उपस्थित केले गेलेले १,५८९ प्रश्नांचं प्रमाण २६ आहे. नंदुरबार जिल्ह्यातून सर्वात कमी ७४ प्रश्न मांडले गेले. महिला-मुलींविषयक एकही प्रश्न त्यात नाही. नांदेड जिल्ह्यातून सर्वाधिक ५११ प्रश्न विचारले. गडचिरोली जिल्ह्यातून जिल्ह्याचा माविनि अल्प असल्याने त्यात सुधारणा करण्याची गरज आहे, या विषयावरचा प्रश्न विचारला आहे. धुळे ग्रामीण मतदारसंघाचे काँग्रेस आमदार कुणाल पाटील यांनी या नऊ जिल्ह्यांत सर्वाधिक प्रश्न (३५७) विचारले. आमच्या चार प्रमुख अभ्यासविषयांत आरोग्यविषयक ३१, शालेय शिक्षणाबाबत १७, महिलाविषयक ९ आणि बालकांविषयी ७ प्रश्न आहेत. केंद्र सरकारचं मिशन अंत्योदय, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (एनएफएचएस) आणि हार्वर्ड लॅब संशोधन यांनी उपलब्ध केलेल्या डेट्याच्या आधारे या जिल्ह्यातल्या गाभ्याच्या समस्या आणि उपस्थित प्रश्न यांचा विचार करू शकतो.पाच वर्षांखालील बालकांचं लसीकरण, पोलिओचे तीन डोस, दवाखान्यात प्रसूती, मासिक पाळीचं व्यवस्थापन या बाबतीत या नऊ जिल्ह्यांमध्ये प्रगती आहे. सर्वच नऊ जिल्ह्यांत बालकांमधल्या रक्तक्षयाचं प्रमाण ३ ते ३६ नी वाढलेलं दिसतं.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आमच्यापैकी कोणाची बायको हिरॉइन नाही!

## शरद पवारांचे कार्यकर्ते आक्रमक; मुंबईत बंडखोरी होणार?

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शरद पवारांच्या राष्ट्रवादीने आज नऊ उमेदवारांची यादी जाहीर केली. आजच्या यादीत त्यांनी अनुशक्ती नगरमधून अभिनेत्री स्वरा भास्कर हिचे पती फहाद अहमद (FAHAD AHMAD) यांना उमेदवारी देऊ केली आहे. या उमेदवारीवरून आता वाद सुरू झाला आहे. अनुशक्ती नगरमधील स्थानिक पदाधिकारी यांनी संताप व्यक्त केला असून कार्यकर्त्यांशी बोलून पुढील निर्णय घेतला जाईल, असा सूचक इशाराही देण्यात आला आहे. ते टीव्ही ९ मराठीशी बोलत होते.**



अनुशक्ती नगर येथून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अनेक पदाधिकारी इच्छूक होते. अजित पवारांनी राष्ट्रवादी पक्षात बंडखोरी केल्यानंतर अनेक पदाधिकाऱ्यांनी शरद पवारांना समर्थन दिलं होतं. त्यामुळे शरद पवार निष्ठावान कार्यकर्त्याला संधी देतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. परंतु, या जागेवरून शरद पवारांनी समाजवादी पक्षाच्या नेत्याला आपल्या पक्षात घेऊन उमेदवारी देऊ केली. त्यामुळे अनुशक्तीनगरमधील कार्यकर्ते नाराज झाले आहेत. इच्छूक उमेदवार निलेश भोसले यांनी यासंदर्भात टीव्ही ९ शी संवाद साधताना फहाद अहमद यांच्यावरही टीका केली.निलेश भोसले म्हणाले, “आम्ही जेवढ्या इच्छूकांनी अर्ज केला होता, आमच्यापैकी कोणाची बायको हिरॉइन नसल्याने आम्हाला टाळलं असावं. राष्ट्रवादी काँग्रेसचा कणा म्हणजे पक्षाचा सर्वसामान्य कार्यकर्ता आहे. कार्यकर्ते आम्हाला दिशा ठरवून देत नाहीत, तोवर कोणताही निर्णय घेणार नाही. निष्ठेने शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत उभे राहणार.”“अजित पवारांसह ४० आमदार गेले, तरीही आम्ही हललो नाही. चांगले दिवस येतील तेव्हा आमच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा विचार होईल असं वाटलं होतं. पण अर्ध्या तासांपूर्वी समाजवादी पक्षाचा कार्यकर्त्याचा पक्षात प्रवेश केला अन् त्याला उमेदवारी दिली. हे दुर्भाग्यपूर्ण आहे”, असं निलेश भोसले म्हणाले.राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने आज नवी यादी जाहीर केली. आजच्या यादीत ९ जणांना उमेदवारी देण्यात आली आहे. महत्त्वाचं म्हणजे अभिनेत्री स्वरा भास्करचा पती फहाद अहमद यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नवाब मलिक यांची लेक सना मलिक यांच्याविरोधात ते उभे ठाकले आहेत. अनुशक्तीनगर येथून त्यांना उमेदवारी देण्यात आली आहे. जयंत पाटील यांनी आज पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली.“ते उच्च शिक्षित असून मुस्लीम तरुण आहेत. त्यांनी टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्समध्ये अभ्यास केला आहे. ते चांगले ॲक्टिव्हिस्ट असून देशभर त्यांचं चांगलं नाव आहे. ते आधी आमच्या पक्षात नव्हते. ते पूर्वी समाजवादी पक्षात होते. चर्चा करून आम्ही त्यांना आमच्या पक्षात घेतलं असून त्यांना निवडणुकीसाठी उमेदवारी दिली आहे”, असं जयंत पाटील म्हणाले.अनुशक्ती नगर येथून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अनेक पदाधिकारी इच्छूक होते. अजित पवारांनी राष्ट्रवादी पक्षात बंडखोरी केल्यानंतर अनेक पदाधिकाऱ्यांनी शरद पवारांना समर्थन दिलं होतं. त्यामुळे शरद पवार निष्ठावान कार्यकर्त्याला संधी देतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. परंतु, या जागेवरून शरद पवारांनी समाजवादी पक्षाच्या नेत्याला आपल्या पक्षात घेऊन उमेदवारी देऊ केली. त्यामुळे अनुशक्तीनगरमधील कार्यकर्ते नाराज झाले आहेत. इच्छूक उमेदवार निलेश भोसले यांनी यासंदर्भात टीव्ही ९ शी संवाद साधताना फहाद अहमद यांच्यावरही टीका केली.निलेश भोसले म्हणाले, “आम्ही जेवढ्या इच्छूकांनी अर्ज केला होता, आमच्यापैकी कोणाची बायको हिरॉइन नसल्याने आम्हाला टाळलं असावं. राष्ट्रवादी काँग्रेसचा कणा म्हणजे पक्षाचा सर्वसामान्य कार्यकर्ता आहे. कार्यकर्ते आम्हाला दिशा ठरवून देत नाहीत, तोवर कोणताही निर्णय घेणार नाही.

### फहाद अहमद यांना उमेदवारी

निष्ठेने शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत उभे राहणार.”“अजित पवारांसह ४० आमदार गेले, तरीही आम्ही हललो नाही. चांगले दिवस येतील तेव्हा आमच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा विचार होईल असं वाटलं होतं. पण अर्ध्या तासांपूर्वी समाजवादी पक्षाचा कार्यकर्त्याचा पक्षात प्रवेश केला अन् त्याला उमेदवारी दिली. हे दुर्भाग्यपूर्ण आहे”, असं निलेश भोसले म्हणाले.राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने आज नवी यादी जाहीर केली. महत्त्वाचं म्हणजे अभिनेत्री स्वरा भास्करचा पती फहाद अहमद यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नवाब मलिक यांची लेक सना मलिक यांच्याविरोधात ते उभे ठाकले आहेत. अनुशक्तीनगर येथून त्यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# सम-समान फॉर्म्युल्यावर प्रश्नचिन्ह!

## नाना पटोले यांनी 85-85-85 चा फॉर्म्युला जाहीर केला

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मविआतील जागावाटपाचा घोळ अद्यापही संपलेला नाही. काही दिवसांपूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत नाना पटोले यांनी ८५-८५-८५ चा फॉर्म्युला जाहीर केला होता. त्यानुसार मविआतली प्रमुख तीन घटकपक्षांना समसमान जागा देणार असल्याचं जाहीर केलं. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी बाळासाहेब थोरातांनी ९०-९०-९० चा फॉर्म्युला जाहीर केला.**




परंतु, काँग्रेसने आतापर्यंत जाहीर केलेल्या यादीनुसार काँग्रेसने १०० उमेदवार घोषित केले आहेत. त्यामुळे मविआतील समसमान फॉर्म्युल्याचं काय झालं? हा प्रश्न अधोरेखित होत आहे.काँग्रेसने २४ ऑक्टोबर रोजी ४८ जणांची नावे जाहीर केली होती. तर, २६ ऑक्टोबरला २३ नावे जाहीर केली. त्यादिवशी रात्री १६ जणांना उमेदवारी देण्यात आली. तर आज १४ जणांची नावे जाहीर करण्यात आली आहे. यांची बेरीज करता काँग्रेसने आतापर्यंत १०१ उमेदवार जाहीर केले आहेत. परंतु, सचिन सावंत यांचं कालच्या यादीत नाव होतं, त्यांचं नाव बदलून आजच्या यादीत अशोक जाधव यांचं नाव जाहीर करण्यात आलंय. त्यामुळे काँग्रेसचे एकूण १०० उमेदवार जाहीर झालेले आहेत.उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख जवळ येऊन ठेपल्याने उमेदवार याद्या जाहीर केले जात आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे), मनसेने उमेदवार जाहीर केल्यानंतर आता काँग्रेसनेही उमेदवार जाहीर केले आहेत.

### काँग्रेसने शंभरी पार केली

. काँग्रेसच्या आताच्या यादीतून १४ उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. अंधेरी पश्चिममधून उमेदवार बदलण्यात आला आहे. कालच्या यादीत सचिन सावंत यांना उमेदवारी दिली होती. परंतु, या जागेवरून त्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर आज या जागेवरून अशोक जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे.महाविकास आघाडीचा समसमान वाटपाचा फॉर्म्युला ठरला होता. परंतु, काँग्रेसने आतापर्यंत जाहीर केलेल्या यादीनुसार काँग्रेसने शंभरी पार केली आहे. त्यामुळे मविआच्या समसमान जागा वाटपाचं काय झालं? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# हिंदूंची एकजूट सर्वांच्या हितासाठीच!

## फूट पाडू पाहणाऱ्या शक्तींपासून सावध रहा : होसबाळे

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**धर्म, जात आणि विचारसरणीच्या नावाखाली फूट पाडू पाहणाऱ्या शक्तींपासून आपण सावध राहिले पाहिजे. आपण जात, भाषा किंवा प्रदेशाच्या आधारावर विभागलो गेलो तर आपला नक्कीच नाश होईल. त्यामुळेच हिंदू समाजाची एकजूट सर्वांच्या हितासाठी आवश्यक असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांनी केले.**



दीनदयाळ उपाध्याय गाय विज्ञान संशोधन व प्रशिक्षण केंद्र परिसरात आयोजित संघटनेच्या अखिल भारतीय कार्यकारी मंडळाच्या दोनदिवसीय बैठकीच्या समारोपप्रसंगी ते पत्रकार परिषदेला संबोधित करीत होते. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काही दिवसांपूर्वीच केलेल्या 'बटेंगे तो कटेंगे' (फूट पडली तर विभागू) या वक्तव्यासंदर्भात बोलताना हिंदू समाज जर एकजूट राहिला नाही तर आजकालच्या भाषेत 'बटेंगे तो कटेंगे' स्थिती उद्भवू शकते, अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली.हिंदूंची एकजूट लोककल्याणासाठी आहे. ती कायम राखणे आणि अन्य लोकांचेही भले करण्यासाठी हिंदू एकजूट राहणे आवश्यक आहे. त्यामुळेच आम्ही एकजूट कायम रहावी यासाठी प्रयत्न करीत आहोत. हे केवळ बोलून होणार नाही तर त्यासाठी प्रयत्न करावे लागतील, आचरणातही आणावे लागेल, यात दुमत नाही.संसदेत वक्फसंदर्भात आणलेल्या विधेयकाशी संबंधित प्रश्नावर बोलताना संयुक्त संसदीय समितीपुढे (जेपीसी) सुनावणी सुरू आहे. प्रत्यक्षात फार पूर्वी तयार केलेल्या वक्फ अधिनियमात २०१३ मध्ये केलेल्या दुरुस्तीमुळे भारतातच एक प्रकारे स्वतंत्र शाखा स्थापन झाली होती. यात सक्षम अधिकाऱ्यालाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नव्हता, असे होसबळे म्हणाले. केवळ हिंदूंचाच या विधेयकाला विरोध आहे असे नाही तर मुस्लीम समुदायातील बऱ्याच व्यक्तींनीही जेपीसीसमोर आपले मत व्यक्त केले आहे, असे होसबळे म्हणाले. वक्फद्वारे केले जात असलेले अत्याचार आणि अन्यायाने त्रस्त असलेला हाच समाज असल्याचे ते म्हणाले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काही दिवसांपूर्वी केलेल्या 'बटेंगे तो कटेंगे' (फूट पडली तर विभागू) या वक्तव्यासंदर्भात बोलताना हिंदू समाज जर एकजूट राहिला नाही तर आजकालच्या भाषेत 'बटेंगे तो कटेंगे' स्थिती उद्भवू शकते, अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली.हिंदूंची एकजूट लोककल्याणासाठी आहे. ती कायम राखणे आणि अन्य लोकांचेही भले करण्यासाठी हिंदू एकजूट राहणे आवश्यक आहे. त्यामुळेच आम्ही एकजूट कायम रहावी यासाठी प्रयत्न करीत आहोत. हे केवळ बोलून होणार नाही तर त्यासाठी प्रयत्न करावे लागतील, आचरणातही आणावे लागेल, यात दुमत नाही.संसदेत वक्फसंदर्भात आणलेल्या विधेयकाशी संबंधित प्रश्नावर बोलताना संयुक्त संसदीय समितीपुढे (जेपीसी) सुनावणी सुरू आहे. प्रत्यक्षात फार पूर्वी तयार केलेल्या वक्फ अधिनियमात २०१३ मध्ये केलेल्या दुरुस्तीमुळे भारतातच एक प्रकारे स्वतंत्र शाखा स्थापन झाली होती. यात सक्षम अधिकाऱ्यालाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नव्हता, असे होसबळे म्हणाले. केवळ हिंदूंचाच या विधेयकाला विरोध आहे असे नाही तर मुस्लीम समुदायातील बऱ्याच व्यक्तींनीही जेपीसीसमोर आपले मत व्यक्त केले आहे, असे होसबळे म्हणाले. वक्फद्वारे केले जात असलेले अत्याचार आणि अन्यायाने त्रस्त असलेला हाच समाज असल्याचे ते म्हणाले. एकजूट लोककल्याणासाठी आहे. ती कायम राखणे आणि अन्य लोकांचेही भले करण्यासाठी हिंदू एकजूट राहणे आवश्यक आहे.

### हिंदू समाज एकजूट राहिला नाही

त्यामुळेच आम्ही एकजूट कायम रहावी यासाठी प्रयत्न करीत आहोत. हे केवळ बोलून होणार नाही तर त्यासाठी प्रयत्न करावे लागतील, आचरणातही आणावे लागेल, यात दुमत नाही.संसदेत वक्फसंदर्भात आणलेल्या विधेयकाशी संबंधित प्रश्नावर बोलताना संयुक्त संसदीय समितीपुढे (जेपीसी) सुनावणी सुरू आहे. प्रत्यक्षात फार पूर्वी तयार केलेल्या वक्फ अधिनियमात २०१३ मध्ये केलेल्या दुरुस्तीमुळे भारतातच एक प्रकारे स्वतंत्र शाखा स्थापन झाली होती. यात सक्षम अधिकाऱ्यालाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नव्हता, असे होसबळे म्हणाले. केवळ हिंदूंचाच या विधेयकाला विरोध आहे असे नाही तर मुस्लीम समुदायातील बऱ्याच व्यक्तींनीही जेपीसीसमोर आपले मत व्यक्त केले आहे, असे होसबळे म्हणाले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काही दिवसांपूर्वीच केलेल्या 'बटेंगे तो कटेंगे' (फूट पडली तर विभागू) या वक्तव्यासंदर्भात बोलताना हिंदू समाज जर एकजूट राहिला नाही.

# जयशंकर यांनी सांगितली कॅनडातील गंभीर स्थिती

## कॅनडाने भारताच्या पाठीत खंजीर खुपसला; भारताचे उच्चायुक्त

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि कॅनडाचे संबंध दिवसेंदिवस खराब होत चालले आहेत. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो सातत्याने भारतविरोधी शक्तींना देशात आश्रय देताना दिसत आहेत. परंतु, भारताला ते मान्य नाही. त्यामुळे भारताने आपले कॅनडातील उच्चायुक्त आणि अन्य राजनैतिक अधिकाऱ्यांना परत बोलावून घेतलं आहे. त्यानंतर कॅनडाचे भारतातील अधिकारी देखील माघारी परतले आहेत.**



खलिस्तानी फुटीरतावादी हरदीपसिंग निज्जरच्या हत्येत भारताच्या कथित सहभागाबाबतच्या आरोपानंतर भारत आणि कॅनडाचे संबंध बिघडत गेले आहेत. पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांच्यावर व्होट बँकेच्या राजकारणात गुंतल्याचा आरोप करीत हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येबाबत भारतावर करण्यात आलेले आरोप भारताने फेटाळले आहेत. दोन्ही देशांनी एकमेकांच्या प्रत्येकी सहा राजनैतिक अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली आहे. दरम्यान, भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी यावर भारताची नेमकी भूमिका स्पष्ट केली आहे. एस. जयशंकर यांनी शनिवारी (२६ ऑक्टोबर) पुण्यातील एका कार्यक्रमात सांगितलं की "भारताने कॅनडातील संघटित गुन्हेगारीचा मुद्दा उपस्थित केला होता. परंतु, कॅनडा सरकारने त्याकडे डोळेझाक केली. कॅनडाचं सरकार भारतीय उच्चायुक्त व तिथल्या राजनैतिक अधिकाऱ्यांना लक्ष्य करत होतं. त्याला भारताने जशास तसं प्रत्युत्तर दिलं. भारताच्या राष्ट्रहिताचा, अखंडतेचा किंवा सार्वभौमत्वाचा प्रश्न येतो तेव्हा भारत कठोर पावलं उचलतो. ट्रुडो सरकारने आपल्या उच्चायुक्तांना व तिथल्या राजनैतिक अधिकाऱ्यांना लक्ष्य केल्यानंतर भारतानेही त्या कृतीला योग्य उत्तर दिलं आहे". भारताचे परराष्ट्र मंत्री म्हणाले, "तिथे एक एक छोटासा गट आहे, ज्याने स्वतःला मोठी राजकीय शक्ती बनवलं आहे. दुर्दैवाने तिथल्या देशाचे राजकारणी त्या गटाचं लांगुलचालन करत आहेत. ते केवळ आपल्यासाठीच नव्हे तर उभय देशांच्या संबंधांसाठी वाईट आहे. मी तर म्हणेन की ते कॅनडासाठी देखील धोक्याचं आहे".लोकशाही असलेल्या देशाने पाठीत खंजीर खुपसल्याचा गंभीर आरोप भारताचे उच्चायुक्त संजय वर्मा यांनी कॅनडाच्या वागणुकीवर आक्षेप घेताना केला.

### भारतविरोधी शक्तींना देशात आश्रय

कॅनडाने अत्यंत अव्यावसायिक पद्धतीने वागवल्याचेही त्यांनी म्हटले आहे. 'पीटीआय'ला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. भारतात परतल्यानंतर बुधवारी 'पीटीआय'शी विविध मुद्द्यांवर बोलताना वर्मा यांनी कॅनडातील खलिस्तानी चळवळीची उत्पत्ती, स्थानिक राजकारण्यांकडून निवडणुकीतील फायद्यासाठी मिळत असलेला पाठिंबा आदींविषयी सांगितले. भारत आणि कॅनडाचे संबंध दिवसेंदिवस खराब होत चालले आहेत. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो सातत्याने भारतविरोधी शक्तींना देशात आश्रय देताना दिसत आहेत.

# आतिफ अस्लमने दाखवली लेकीची पहिली झलक

बॉलिवूड गाण्यांमधून लोकप्रियता मिळवणाऱ्या आतिफ अस्लमचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात चाहते आहेत. या सुप्रसिद्ध गायकाला एका वर्षापूर्वी कन्यारत्नाचा लाभ झाला. आतिफची पत्नी साराने २३ मार्च २०२३ला गोंडस बाळाला जन्म दिला आणि सोशल मीडियावरुन आतिफने बाबा झाल्याची गुडन्यूज चाहत्यांना दिली होती. आज (२३ मार्च रोजी) आतिफ त्याच्या गोंडस मुलीचा पहिला वाढदिवस साजरा करत आहे त्यानिमित्ताने आतिफने पहिल्यांदाच त्याच्या मुलीचा हलीमाचा फोटो शेअर केला आहे.आतिफ अस्लमने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे. बरोबर एका वर्षानंतर आज पहिल्यांदाच त्याने हलीमाचा चेहरा जगासमोर आणला आहे. पहिल्या फोटोत बाबा आतिफ हलीमाबरोबर खेळताना दिसतोय. तर दुसऱ्या फोटोत सफेद फ्रॉकवर हलिमा एकदम गोंडस दिसत आहे. या पोस्टला आतिफने कॅप्शन देत लिहिले, "बाबाने राजकन्येचे शूज खिशात ठेवले आहेत, जेव्हा माझ्या हलीमाला तो हवा असेल तेव्हा ती सांगेल. २३/०३/२०२३- तुला वाढदिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा.

"आतिफच्या लाडक्या लेकीचा फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या पोसटवर आतिफच्या अनेक चाहत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. एकाने कमेंट करत लिहिले, "किती सुंदर आहे हलीमा, तुला वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा". "अल्लाह तुमच्या जीवनात आनंद आणि आशीर्वाद घेऊन येवो. वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा गोंडस हलीमा" असं दुसऱ्याने लिहिलं.दरम्यान, आतिफ अस्लमच्या वैयक्तिक आयुष्याबाबत सांगायचं झालं तर, २०१३मध्ये आतिफने साराशी लाहौरमध्ये निकाह केला होता. त्यांना अब्दुल व अर्यान ही दोन मुले आहेत आणि हलीना त्यांची तिसरी अपत्य आहे. पाकिस्तानी सिंगर असलेल्या आतिफने बॉलिवूडमध्ये नाव कमावलं. त्याची अनेक गाणी लोकप्रिय आहेत.बॉलिवूड गाण्यांमधून लोकप्रियता मिळवणाऱ्या आतिफ अस्लमचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात चाहते आहेत. या सुप्रसिद्ध गायकाला एका वर्षापूर्वी कन्यारत्नाचा लाभ झाला. आतिफची पत्नी साराने २३ मार्च २०२३ला गोंडस बाळाला जन्म दिला आणि सोशAल मीडियावरुन आतिफने बाबा झाल्याची गुडन्यूज चाहत्यांना दिली होती.

## गोविंदाने पुन्हा केलं लग्न

सध्या बॉलीवूड अभिनेता गोविंदा खूप चर्चेत आला आहे. एकाबाजूला तो राजकारणात पुन्हा एन्ट्री करणार असल्याची चर्चा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबरोबर त्याची भेट झाल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे गोविंद पुन्हा एकदा लोकसभा निवडणुकाच्या रिंगणात उतरणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशातच दुसऱ्या बाजूला गोविंदाने ३७ वर्षांनंतर पुन्हा एकदा लग्न केलं आहे. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतं आहे. अभिनेता गोविंदा व त्याची पत्नी सुनीता आहुजा 'डान्स दिवाने'च्या चौथ्या पर्वात उपस्थित राहिले होते. याच सेटवर 'कलर्स टीव्ही'च्या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे.या व्हिडीओत, माधुरी दीक्षित म्हणतेय "आमच्याकडे लग्नाचे फोटो देखील नाहीयेत." तर माधुरी म्हणते, "फोटो नाहीत, काही हरकत नाही. 'डान्स दिवाने'चं कुटुंब आहे.

## कंगना अडकणार लग्नबंधनात?



मागील काही महिन्यांत अनेक बॉलीवूड कलाकार आपल्या आयुष्याला नवीन सुरुवात करीत लग्नबंधनात अडकले आहेत. आधी रकुल प्रीत सिंग व जॅकी भगनानी आणि आता क्रिती खरबंदा व पुलकित सम्राट यांनी लग्नगाठ बांधली. आता बॉलीवूडची क्वीन कंगना रणौतही तिच्या नवीन आयुष्याला लवकरच सुरुवात करणार असल्याची माहिती समोर आली आहे. कंगनाने आपल्या लग्नाचे कपडेदेखील निवडले असल्याची चर्चा सुरू आहे. 'रेडिट'वर आलेल्या माहितीनुसार, कंगना आपल्या लग्नातील पोशाख एका ड्रेस डिझायनरकडून तयार करून घेणार आहे. कंगनाचा हा ड्रेस डिझायनर इंडस्ट्रीमधलाच आहे; पण तितकासा सुप्रसिद्ध नाही. कंगनाच्या लग्नाबद्दलच्या गोष्टी खासगी ठेवण्यात आल्या आहेत. कंगना कोणाशी लग्न करणार आहे हे अजून जाहीर झालं नसलं तरी तिचा बॉयफ्रेंड आहे, असं तिनं आधी कबूल केलं होतं.रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात कंगनानं हजेरी लावली होती. त्यादरम्यान, कंगना आणि निशांतचे अयोध्येतील राम मंदिरातील काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते आणि त्यामुळेच कंगना निशांतला डेट करीत असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. पण, अभिनेत्रीनं या अफवा असल्याचं स्पष्ट केलं आणि ती दुसऱ्याच कोणाला तरी डेट करतेय; परंतु तो निशांत नाही, असा खुलासा तिनं केला होता.निशांत पिट्टीबरोबर कंगनाचं अफेअर असल्याचा दावा करणाऱ्या मीडिया रिपोर्टचा स्क्रीनशॉट शेअर करीत कंगनानं तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर लिहिलं, "माझी मीडियाला नम्र विनंती आहे की, कृपया चुकीची माहिती पसरवू नका. निशांतजी विवाहित आहेत आणि मी दुसऱ्या कोणाला तरी डेट करीत आहे. योग्य वेळ आल्यावर मी त्याबद्दल सांगेन. एका महिलेनं एखाद्या पुरुषाबरोबर फोटो काढल्यानं रोज तिचं नाव एखाद्या नवीन पुरुषाशी जोडणं योग्य नाही."मध्यंतरी कंगना एका परदेशी व्यक्तीबरोबर हातात हात धरून चालताना दिसली होती. तेव्हा तो तिचा बॉयफ्रेंड असल्याच्या चर्चाही सुरू होत्या. कंगना स्पष्टवक्ती आहे आणि प्रत्येक गोष्ट ती सोशल मीडियावर शेअर करते. अशात तिच्या लग्नाची बातमी ती चाहत्यांपासून का लपवून ठेवेल.

## शाहरुख खान करतो कोटींची कमाई

शाहरुख खानला बॉलीवूडमधील किंग खान या नावाने ओळखले जाते. शाहरुखचं वैयक्तिक आयुष्यही एका राजासारखंच आहे. शाहरुख आपल्या अभिनयाच्या जोरावर एका चित्रपटात कोटींची कमाई करतो. अभिनय क्षेत्रात तर किंग खानचा पाय रोवला गेला आहे पण शाहरुख क्रिकेटद्वारेसुद्धा बक्कळ कमाई करतो. २०२४च्या आयपीलच्या हंगामाला सुरूवात झाली असून कालच 'चेन्नई सुपर किंग्ज' विरुद्ध 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' यांचा पहिला सामना पार पडला. 'चेन्नई सुपर किंग्ज'ने या सामन्यात बाजी मारली. तर आज 'कोलकाता नाइट रायडर्स' आणि 'सनरायझर्स हैदराबाद' यांचा सामना सुरू झाला आहे. शाहरुख खान 'कोलकाता नाइट रायडर्स' या टीमचा मालक आहे. आयपीलमधून दरवर्षी शाहरुखची किती कमाई होते याबद्दल जाणून घेऊयात. प्रत्येक आयपीएल संघाला टीव्ही ब्रॉडकास्ट आणि बीसीसीआयच्या प्रायोजकत्वातून मिळणाऱ्या कमाईचा काही हिस्सा मिळतो. शाहरुख खान आयपीएलमधील 'कोलकाता नाईट रायडर्स' संघाचा मालक आहे. या संघाद्वारे, शाहरुख खान ब्रँड एंडोर्समेंट्स, मॅच फी, फ्रँचायझी फी, BCCI इव्हेंट रेव्हेन्यू आणि बक्षीस रकमेतून भरपूर कमाई करतो. मात्र, यातून त्यांना किती कोटींची कमाई होते, याचा खुलासा झालेला नाही.मीडिया रिपोर्ट्सनुसार, शाहरुख खान आयपीएलमधील त्याच्या टीममधून दरवर्षी २५० ते २७० कोटी रुपयांची कमाई करतो. मात्र, या सामन्यांमध्ये अंदाजे १०० कोटींचा खर्चही होतो. हा सगळा खर्च खेळाडूंच्या खरेदी आणि व्यवस्थापनावर होतो.'कोलकाता नाईट रायडर्स'ची या संघाची कमाई १५० कोटींहून अधिक आहे.



## 'मिस युनिव्हर्स' मध्ये सहभागी होण्यास मनाई

उर्वशी रौतेलाने तिच्या करिअरची सुरूवात मॉडेलिंगपासून केली. २०१२ साली 'आय एम शी – मिस युनिव्हर्स इंडिया' सौंदर्यस्पर्धेत ती जिंकली होती. परंतु 'मिस युनिव्हर्स' २०१२ मध्ये तिला सहभागी होता आले नाही याची खंत तिला नेहमी वाटते. २०१२ सालची 'आय एम शी – मिस युनिव्हर्स इंडिया' स्पर्धा जिंकल्यानंतर उर्वशी रौतेलाचं पुढचं ध्येय 'मिस युनिव्हर्स' जिंकण्याचं होतं. परंतु, शेवटच्या क्षणी काही अडचणी आल्यामुळे तिला ते साध्य करता आलं नाही. तेव्हा भारताचे प्रतिनिधी निवडण्याची जबाबदारी सुष्मिता सेन यांच्या कंपनीकडे होती.'मिरची प्लस'ला दिलेल्या मुलाखतीत उर्वशीने याबाबत खुलासा केला. ती म्हणाली, "मी जेव्हा २०१२ मध्ये पहिल्यांदा 'मिस युनिव्हर्स इंडिया'चा किताब जिंकले. तेव्हा डोनाल्ड ट्रम्प आमचे बॉस होते 'मिस युनिव्हर्स'साठी वयाची मर्यादा आहे. 'मिस युनिव्हर्स'स मध्ये सहभाग घेण्यासाठी वय मर्यादा १८ होती. याबद्दल मला काहिचं माहित नव्हतं. मी तेव्हा १७ वर्षांची होती आणि लवकरच १८ वर्षांची होणार होती.

# साजिद खानचा मजेशीर व्हिडीओ!

## साजिद खानच्या उत्तराने पत्रकार परिषदेत पिकला हशा

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पाकिस्तानचा फिरकी गोलंदाज साजिद खान सध्या कसोटी क्रिकेटमध्ये धुमाकूळ घालत आहे. ३१ वर्षीय साजिदने इंग्लंडविरुद्धच्या दोन कसोटीत २१.११ च्या सरासरीने १९ विकेट्स घेतल्या. साजिदने नोमान अलीसह पाकिस्तानच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. अलीने दोन कसोटीत एकूण २० विकेट्स घेतल्या. पहिली कसोटी गमावल्यानंतर पाकिस्तानने पुढील दोन कसोटी जिंकून मालिका २-१ अशी जिंकली. या मालिकेनंतर साजिद खानचा मजेशीर व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**




इंग्लंडविरुद्ध नुकत्याच पार पडलेल्या कसोटी मालिकेत साजिद खानच्या फिरकी जादू पाहायला मिळाली. त्याने दमदार गोलंदाजी करून संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. इतकंच नाही तर त्याच्या आणि नोमान अलीच्या जोडीनं विरोधी संघाच्या मनात दहशत निर्माण करण्याचं काम केलं. त्यानंतर चाहत्यांना पाकिस्तानचा तो काळ आठवला, जेव्हा वसीम अक्रम आणि वकार युनूस ही जोडी आपल्या गोलंदाजीने विरोधी संघावर दडपण निर्माण करुन त्यांना गुडघे टेकायला भाग पाडायचे. रावळपिंडीत खेळल्या गेलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यानंतर साजिद खान पत्रकार परिषदेला आला, तेव्हा त्याने आपल्या उत्तराने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. साजिद खानचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. ज्यामध्ये पत्रकार परिषदेदरम्यान एका पत्रकाराने त्याला विचारले की, "एक काळ असा होता जेव्हा वकार युनूस आणि वसीम अक्रम खेळायचे, आम्ही एकाला घाबरवताना आणि दुसऱ्याला विकेट घेताना पाहायचो. इथे आम्ही पाहिले की तुम्ही घाबरवत आहात आणि नोमान विकेट घेत होते. यावर तुमचे काय म्हणणे आहे?"यावर प्रतिक्रिया देताना साजिद खान म्हणाला की, "मी तर कोणाला घाबरवले नाही. तुम्हीच म्हणताय की घाबरवतो. असे काही नाही. आता अल्लाहने मला हा लूकच असा दिला आहे. ज्यामुळे मी हसलो तरी लोक घाबरतात." साजिदच्या या उत्तरावर त्याचा सहकारी खेळाडू नोमानसह सर्व पत्रकार हसू लागले. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.स्टार फिरकीपटू साजिदने मे २०२१ मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध हरारे येथे पाकिस्तानसाठी कसोटी पदार्पण केले होते. आतापर्यंत, त्याने त्याच्या राष्ट्रीय संघासाठी १० कसोटी सामन्यांच्या १९ डावांमध्ये ४४ विकेट्स घेतल्या आहेत. साजिद नुकताच इंग्लंडविरुद्ध्या ऐतिहासिक कसोटी मालिकेतील विजयाचा 'प्लेअर ऑफ द सिरीज' ठरला आहे. पाकिस्तान संघ आता ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका आणि तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. ही मालिका ४ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर दरम्यान खेळवली जाणार आहे.इंग्लंडविरुद्ध नुकत्याच पार पडलेल्या कसोटी मालिकेत साजिद खानच्या फिरकी जादू पाहायला मिळाली. त्याने दमदार गोलंदाजी करून संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. इतकंच नाही तर त्याच्या आणि नोमान अलीच्या जोडीनं विरोधी संघाच्या मनात दहशत निर्माण करण्याचं काम केलं. त्यानंतर चाहत्यांना पाकिस्तानचा तो काळ आठवला, जेव्हा वसीम अक्रम आणि वकार युनूस ही जोडी आपल्या गोलंदाजीने विरोधी संघावर दडपण निर्माण करुन त्यांना गुडघे टेकायला भाग पाडायचे. रावळपिंडीत खेळल्या गेलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यानंतर साजिद खान पत्रकार परिषदेला आला, तेव्हा त्याने आपल्या उत्तराने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. साजिद खानचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. ज्यामध्ये पत्रकार परिषदेदरम्यान एका पत्रकाराने त्याला विचारले की, "एक काळ असा होता जेव्हा वकार युनूस आणि वसीम अक्रम खेळायचे, आम्ही एकाला घाबरवताना आणि दुसऱ्याला विकेट घेताना पाहायचो. इथे आम्ही पाहिले की तुम्ही घाबरवत आहात आणि नोमान विकेट घेत होते. यावर तुमचे काय म्हणणे आहे?"यावर प्रतिक्रिया देताना साजिद खान म्हणाला की, "मी तर कोणाला घाबरवले नाही. तुम्हीच म्हणताय की घाबरवतो. असे काही नाही.

### खेळाडू नोमानसह सर्व पत्रकार हसू लागले

आता अल्लाहने मला हा लूकच असा दिला आहे. ज्यामुळे मी हसलो तरी लोक घाबरतात." साजिदच्या या उत्तरावर त्याचा सहकारी खेळाडू नोमानसह सर्व पत्रकार हसू लागले. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.स्टार फिरकीपटू साजिदने मे २०२१ मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध हरारे येथे पाकिस्तानसाठी कसोटी पदार्पण केले होते. आतापर्यंत, त्याने त्याच्या राष्ट्रीय संघासाठी १० कसोटी सामन्यांच्या १९ डावांमध्ये ४४ विकेट्स घेतल्या आहेत. साजिद नुकताच इंग्लंडविरुद्धच्या ऐतिहासिक कसोटी मालिकेतील विजयाचा 'प्लेअर ऑफ द सिरीज' ठरला आहे.

# ...म्हणून आपण स्वत:च्याच जाळ्यात अडकलो'

## माजी खेळाडूने संघव्यवस्थापनाला धरलं जबाबदार

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**झीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यातही भारताला लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला. अशाप्रकारे भारताने १२ वर्षांनंतर मायदेशात कसोटी मालिका गमावली. माजी भारतीय क्रिकेटपटू मदन लाल यांनी टीम इंडियाच्या पुण्यातील लाजिरवाण्या पराभवामागचे कारण स्पष्ट केले.**




संघाच्या कामगिरीचा आढावा घेताना ते म्हणाले की, टॉप ऑर्डरने मायदेशातील परिस्थितीत चांगली फलंदाजी करायला हवी होती. या सामन्यात न्यूझीलंडने ३५९ धावांचे लक्ष्य दिले होते, प्रत्युत्तरात भारतीय संघ २४५ धावांवर गारद झाला. न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यातील पहिल्या डावात भारताच्या टॉप ऑर्डरच्या तीन फलंदाजांनी मिळून ६० धावा केल्या, तर दुसऱ्या डावात टॉप ऑर्डरच्या तीन फलंदाजांची एकूण धावसंख्या १०८ धावा होती. घरच्या मैदानावर खेळण्याच्या फायद्यावर बोलताना १९८३ चे विश्वचषक विजेते खेळाडू मदन लाल म्हणाले, "आपण सहसा घरच्या मैदानावर मालिका जिंकतो. कारण परिस्थिती आपल्यासाठी अनुकूल असते. खेळपट्ट्या आपल्या शैलीला अनुकूल असतात आणि येथे खेळण्याची अधिक सवय आहे. या सर्व बाबींचा विचार करता भारत वरचढ असतो."मात्र, पुण्यात ज्या पद्धतीने खेळपट्टी तयार करण्यात आली, त्याबद्दल त्यांनी निराशा व्यक्त केली. त्याचबरोबर त्यामागील तर्कावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कारण ही खेळपट्टी भारतीय गोलंदाजांना फारशी मदत करू शकली नाही. त्यामुळे माजी खेळाडू पुढे म्हणाला, "याला आम्ही स्वतः जबाबदार आहोत.

### निश्चितपणे सामना जिंकू शकलो

अशी खेळपट्टी बनवण्यात काही अर्थ नव्हता. अशी खेळपट्टी तयार करण्याचा कोणाचा हट्ट होता? हे मला माहीत नाही. हा संघ व्यवस्थापनाचा निर्णय होता की अन्य कोणाचा?"मदन लाल गोलंदाजीबद्दल पुढे म्हणाले, "तुमच्याकडे एक मजबूत संघ आहे, ज्यात वेगवान आक्रमण आणि उत्कृष्ट फिरकी आक्रमण आहे. तरीही आपण या खेळपट्ट्या बनवल्या आणि स्वत:च्याच जाळ्यात अडकलो. चांगल्या खेळपट्टीवर आपण निश्चितपणे कसोटी सामना जिंकू शकलो.